समरी क्रिमिनल केस नं.२८८ /२०१५
निशाण क्र.५७/सी

फिर्यादीतर्फे साक्षीदार नं.३ यांचा सरतपास तर्फे विधीज्ञ एम.के. कोले वकील यांचेतर्फे जबाब शपथेवर सुरु

| | | |
|---|---|---|
| नाव | : | सलीम सिकंदर शेय |
| वय | : | ४१ |
| व्यवसाय | : | हॉटेल व्यवसाय |
| राहणार | : | लाईन बझार, कसबा बावडा, कोल्हापूर |

या केसमधील फिर्यादी अय्याज नणदीकर व आरोपी जावेद मोरवे यांना मी ओळखतो. ते माझे मित्र आहेत. अय्याज नणदीकर याने जावेद मोरवेला हातउसने पैसे दिले होते. साधारणतः फिर्यादीने आरोपीला तीन लाख सत्तर हजार रूपये दिले होते. या संदर्भात जावेद मोरवेने माझे समक्ष अय्याज नणदीकरला दस्त लिहून दिला होता. आता मला तो निशाणी ३४ वरील दस्त दाखविणेत आला. तो मजकूर तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर फिर्यादी अय्याज नणदीकर व आरोपी जावेद मोरवे तसेच साक्षीदार म्हणून माझी व दुसरा साक्षीदार विक्रमादित्य रमेश बिडकर याची सही आहे. हा दस्त पाडेकर वकील नोटरी यांचेकडे नोंदविणेत आला. दस्तावरील सही जावेद मोरवे याने माझे समक्ष केलेने ती सही मी ओळखतो. या निशाणी ३४ च्या करारपत्रावर जावेद मोरवेचा फोटो व मोटर वाहन परवान्याची झेरॉक्स जोडली आहे.

आरोपी व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा करता गैरहजर. सबब, आरोपीविरूध्द साक्षीदार क्र.३ यांचा उलटतपास नाही असा आदेश पारीत करणेत आला.

श्रवणोत्तर स्विकृत,

दि. ०२/०४/२०२६

( एन.आर.भळगट)
६ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर